नाशिक महानगरपालिका,नाशिक
समाज कल्याण विभाग
जाहिर आवाहन

---

भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अल्मिको),मुंबई यांच्या मार्फत ADIP योजने अंतर्गत दिव्यांग व्यक्तींची पुर्व तपासणी करुन त्यांना आवश्यकता असल्यास भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अल्मिको)यांचे मार्फत दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव व साधने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरीता तालुका निहाय तपासणी शिबिराच्या तारखा निश्चित करण्यात आल्या आहेत. दिनांक २६ ऑक्टोबर २०२३ ते ९ नावेंबर २०२३ या दरम्यान तालुका निहाय अल्मिको,मुंबई यासंस्थेच्या माध्यमातुन दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने वाटप करणेसाठी तपासणी शिबिराचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले. निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार नाशिक येथे **दिनांक २६/१०/२०२३ रोजी लक्षिका मंगल कार्यालय, सिटी सेंटर मॉल समोर, लवाटे नगर, नाशिक** या ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव साहित्य मिळणेसाठी व सदर शिबिरामध्ये सहभाग नोंदविण्याकरीता खालीलप्रमाणे कागदपत्रे शिबिर स्थळी सादर करणे आवश्यक आहे.

१.किमान ४० % दिव्यांगत्व धारण करणेबाबत सक्षम प्राधिकारी यांचे दिव्यांगत्वाचे **ऑनलाईन** प्रमाणपत्र.
२.प्रतिमहा र.रु.२२,५००/- उत्पन्न (वार्षिक र.रु.२,७०,०००/-) चे सक्षम प्राधिकारी यांचे उत्पन्नाचा दाखला.
३.आधारकार्ड
४. एक पुर्ण फोटो (छोट्या साइज मध्ये) व पासपोर्ट आकाराचे २ फोटो,
५.UDID कार्ड
६.१० वी त्यापुढील शिक्षण घेत असलेल्या १००% दृष्टी दोष असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थांना ते शिक्षण घेत असल्याबाबत पुरावा सदर करणे आवश्यक आहे.

तरी नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दिव्यांग व्यक्तींना आवाहन करण्यात येते की, ज्यांना सदर शिबिरामध्ये सहभाग नोंदवायचा आहे,त्यांनी नाशिक महानगरपालिकेच्या खाली नमुद ठिकाणी नांव नोंदणी करावी व शिबिराचे ठिकाणी लागणारे वरील प्रमाणे आवश्यक त्या कागदपत्र तपासणी करुन घ्यावी.

| अ.क्र. | नोंदणीचे ठिकाण | दिनांक | नोंदणीची वेळ |
|---|---|---|---|
| १ | समाज कल्याण विभाग,राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक. | शनिवार-२१.१०.२०२३<br>सोमवार-२३.१०.२०२३<br>बुधवार-२५.१०.२०२३ | सकाळी १०:०० ते दुपारी ०१:००<br>सकाळी १०:०० ते सायं.-०५:००<br>सकाळी १०:०० ते सायं.- ०५:०० |
| २ | समग्र शिक्षण अभियान कार्यालय,नाशिक मनपा शाळा क्रमांक १६,पोलीस हेड कॉटर, गंगापूर रोड, नाशिक | | |
| ३ | समग्र शिक्षण अभियान कार्यालय,URC-२,नाशिक मनपा शाळा क्रमांक ५५,जेतवन नगर,जय भवानी रोड,नाशिकरोड | | |

तसेच दिनांक २६/१०/२०२३ रोजी **लक्षिका मंगल कार्यालय, सिटी सेंटर मॉल समोर, लवाटे नगर, नाशिक** या ठिकाणी अल्मिको,मुंबई याचे मार्फत आयोजित केलेल्या शिबिराकरीता प्रत्यक्ष वरील प्रमाणे आवश्यकत्या मुळ कागदपत्र व त्याचे छायांकित प्रतिंच्या एक संचासह उपस्थित राहून सदर शिबिराचा लाभ घ्यावा.अधिक माहिती करीता नाशिक महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाशी दुरध्वनी क्र.०२५२-२२२२४५४ यावर संपर्क साधवा.

Sd/-
(प्रशांत पाटील)
उप आयुक्त (समाज कल्याण)
नाशिक महानगरपालिका नाशिक